# जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचे समोरील कामकाज

---

**विषयः-** **कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी आदेश.**
**सी.आर.पी.सी 144 प्रमाणे आदेश लागू करणेबाबत**

**वाचलेः-** 1. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144
2. सार्वजिनक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.कोरोना 2020/ प्रक्र.58/आरोग्य5 दि.14/03/2020
3. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897
4. याकार्यालयाकडील पत्र क्र.डिसी/कार्या9ब1/782/2020 दि.22/03/2020
5. महाराष्ट्र शासन अधिसुचना No: DMU/2020/CR.92/DisM-1, दि.23 मार्च 2020

---

क्र.डि.सी./कार्या9ब1/ 836 /2020 **आदेश** अहमदनगर, दि.23/03/2020

---

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13 मार्च 2020 पासुन लागू करुन खंड 2, 3, 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड 19) वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्याकारणासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीयस्तरावरुन व देशांतर्गत विमानप्रवासा व्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत. असे प्रवासी अहमदनगर जिल्ह्यामध्येही प्रवास करुन आलेले आहेत, व काही प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आव्यमपु/कार्या19अ/210/ 2020 दि.19/03/2020 अन्वये अहमदनगर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना विहीत करणाशिवाय अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी येण्यास मनाई राहील असे आदेशित करण्यात आले होते, परंतु अहमदनगर महापालिका हद्दीमध्ये बहुतांश आस्थापना व शाळा बंद असल्यामुळे नागरिक वेळ घालवण्यासाठी व मनोरंजनासाठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक ठिकाणी अनावश्यकरित्या फिरतांना दिसुन आले. शहरातील नागरिकांना कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यांचे घरामध्येच थांबणे आवश्यक आहे. कोरोना विषाणूचे प्रसार माध्यम पाहता सदर विषाणूची लागण एका संक्रमित रुग्णाकडून अन्य व्यक्तीस, इसमास त्याच्या संपर्कात आल्याने

होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तद्नुषंगाने कोरोनाचा प्रादुर्भाव रोखणेस प्रतिबंध व्हावा म्हणुन उक्त संदर्भ क्र.4 अन्वये या कार्यालयाकडून आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, उक्त संदर्भ क्र.5 अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात दि.31/03/2020 पर्यंत लॉकडाऊन अधिसुचना निर्ममित केलेली असल्याने, याआदेशान्वये या कार्यालयाकडील उक्त संदर्भ क्र.4 चा आदेश अधिक्रमीत करण्यात येत आहे.

त्याअर्थी, मी उक्त कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे एक भाग म्हणुन नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमा होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणुन मी जिल्हादंडाधिकारी अहमदनगर मला फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, **अहमदनगर जिल्हा महसुल स्थळ सीमेच्या हद्दीमध्ये** कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार, वाहतुक, फिरणे, उभे राहणे, थांबुण राहणे, रेंगाळणे असे कृत्य करण्यास **दि.23/03/2020 ते दि.31/03/2020 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत** फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये खालील बाबींस मनाई करीत आहे.

1. सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, सण-उत्सव, उरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रिडा व इतर सर्व स्पर्धा इत्यादींना मनाई राहील.

2. सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारचे कृत्य जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, बैठक, मिरवणुक, मेळावे, सभा, आंदोलने, देशांतर्गत व विदेशी सहली इत्यादींचे आयोजन करण्यास मनाई राहील.

3. कार्यक्षेत्रात असणारी दुकाने, सेवा आस्थापना, उपहार गृह, खाद्यगृहे, खानावळ, शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब/पब क्रिडांगणे, मैदाने, जलतरण तलाव, उद्याने, सिनेमागृहे, खाजगी शिकवणी वर्ग, व्यायाम शाळा, संग्रहालय बंद राहतील.

4. सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.

**<u>सदरचा आदेश खालील बाबतीत लागु होणार नाही.</u>**

1.शासकिय, निमशासकीय कार्यालय, सरकारी महामंडळाचे उपक्रम/ आस्थापना , बँक, ATM, विमा सेवा

2. अत्यावश्यक सेवा मधील व्यक्ती, रुग्णालय, पॅथॉलॉजी, लॅबोरेटरी, दवाखाने, ॲम्बुलन्स

3. रेल्वे स्टेशन, एस.टी.स्टँड, बस थांबे व स्थानके, विमानतळ, रिक्षा थांबे, बँक

4. अत्यंविधी (गर्दी टाळून)

5. अत्यावश्यक किराणा सामान, दूध, दूग्धोत्पादने, फळे व भाजी-पाला, औषधालय, LPG गॅस वितरण सेवा, विहीत वेळेत पेट्रोल पंप- (दररोज सकाळी 05.00 ते स. 09.00 वाजेपर्यंत), जिवानावश्यक वस्तू, विक्री/ वितरीत व वाहतूक करण्यास परवानगी राहील. (गर्दी टाळून)

6. प्रसारमाध्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक) नियतकालिके, टि.व्ही. न्युज चॅनेल इत्यादींचे कार्यालय

7. दूरसंचार, पोस्ट व इंटरनेट सेवा पुरविणा-या आस्थापना

8. चिक्स, चिकण व अंडी दुकाने व वाहतुक सेवा

9. जनावरांचे खाद्य, खुराक, पेंड विक्री दुकाने व वाहतुक सेवा

10. पशुवैद्यकीय दवाखाने, पशु औषधालय दुकाने व वाहतुक सेवा

कोणतीही व्यक्ती/ संस्था/ संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड विधान संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशिर कारवाईस व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 व मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43(1) मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

जिल्हा दंडाधिकारी अहमदनगर

स्वाक्षरित/-
(राहुल द्विवेदी)
जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर

प्रतः- पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित

प्रतः- आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत) जिल्हा अहमदनगर

प्रतः- जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना पुढील योग्य त्या उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) जिल्हा अहमदनगर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) जिल्हा अहमदनगर व उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर
2/-सदर आदेशाची स्थानिक दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रतः- मा.प्रधानसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतः- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग मंत्रालय मुंबई-32 यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रतः- मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

(राहुल द्विवेदी)
जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर